# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती

Email roamravati.dte@gmail.com, Web :- www.jdroamt.org

Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913


**महत्वाचे**

क्रमांक :- विकाअ/आस्था/अधिवेशन/२०११/2896

दिनांक :- 12/12/11

**प्रति,**

प्राचार्य,
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, अमरावती.
शासकीय औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, अमरावती
शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती/यवतमाळ/वाशिम/मुर्तिजापुर
शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, यवतमाळ.

**विषय :- विधान मंडळाच्या दिनांक १२ डिसेंबर २०११ पासून नागपूर येथे सुरु होणा-या हिवाळी अधिवेशनासाठी विधान मंडळ कामकाजाशी संबंधित जबाबदार अधिका-यांच्या नियुक्ती बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, दि. १२ डिसेंबर २०११ पासुन नागपूर येथे विधान मंडळाचे अधिवेशन सुरु होत असून अधिवेशन काळात विधानसभा/ विधान परिषद सभागृहात उपस्थित केल्या जाणा-या मुद्यांची अचूक माहीती वेळीच पुरविणे आवश्यक असते. करीता अधिवेशन काळात सभागृहात उपस्थित केलेले प्रश्न,लक्षवेधी सुचनांची मागीतलेली माहीती त्वरीत व बिनचूक पाठविण्याबाबतची दक्षता घेण्यात यावी. तसेच मागीतलेली माहीती पुरविण्यासाठी कार्यालयीन वेळेनंतर उशिरापर्यंत कार्यालयात जबाबदार अधिकारी उपलब्ध असणे आवश्यक आहे.

तरी सर्व संस्थाप्रमुखांनी अधिवेशन कामकाज हाताळण्यासाठी जबाबदार अधिका-यांची नियुक्ती करून त्यांना अधिवेशनाचे कामकाज संपेपर्यत कार्यालयात उशिरापर्यंत थांबण्याबाबत सूचना दयाव्यात. तसेच अधिवेशनाचे कामकाजाकरीता नियुक्त अधिकारी/कर्मचा-यांची नावे या कार्यालयास कळविण्यात यावीत. तसेच अधिवेशन काळात अधिकारी/कर्मचा-यांनी आपले मुख्यालय सोडू नये.

(प्र.वि. सरोदे)
सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

प्रत :- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरीता.

D:\Akash-1\Endosment.dos


Created with nitroPDF professional
download the free trial online at nitropdf.com/professional